## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १९/२०१७-१८/२८०          दिनांक: २७.०९.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. १९/२०१७-२०१८**

| | |
|---|---|
| श्री विश्वास यल्लाप्पा कोळी<br>मु.पो. कासलिंगवाडी ता. जत<br>जि. सांगली | **तक्रार**<br><br>**अर्जदार**<br>**(ग्राहक)** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली | **विरुध्द पक्षकार** |
| ३) कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय कवठेमहाकाळ | |
| ४) उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपाविभाग जत | |

**कोरमः-** १.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी प्रदिप वि. खपली , सदस्य सचिव, ग्राहक तक्रार,निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे -न्याय निर्णय देत आहे.

## ग्राहकांचे गा-हाणे

१) श्री विश्वास यल्लाप्पा कोळी, मु.पो. कासलिंगवाडी ता. जत जि. सांगली यांनी आपल्या गट क्र. ३४७ मध्ये ५ अश्वशक्ती शेती पंपासाठी विज जोडणी पाहिजे म्हणून रु. ५,९७०/- पावती क्र. ५६३९९९२ दिनांक २९.०८.२००३ रोजी महावितरणकडे जमा केले त्यांना वेळेत विज पुरवठा प्राप्त न झाल्यामुळे जत उपविभागाकडे दि. १२.०७.२०१० रोजी विज पुरवठा नको असलेने अनामत रक्कम परत मिळावे असा अर्ज केला तरीही त्यास सर्व पूर्तता करुन पैसे परत मिळाले नाहीत. म्हणून सांगली कक्षाकडे दाद मागितली सांगली कक्षाने पत्र क्र. ४४८३ दि. ०८.०५.२०१७ नुसार कागदपत्रांची पूर्तता केलेवर त्वरीत अनामत रक्कम परत करावे असा आदेश पारित केला आहे. तथापी मी सर्व कागदपत्रे दि. ३०.१२.२०१५ रोजी दिली आहेत. आगाऊ पावतीही दिली आहे. असे म्हणून त्या निर्णया विरुध्द त्यांनी मंचाकडे अपिल दाखल केले आहे. त्यांची मागणी खालील प्रमाणे आहे.

१) भरलेली अनामत रक्कम रु. ५,९७०/- परत मिळावेत
२) दिनांक १२.०७.२०१० ते परतवा मिळेपर्यन्त १२ टक्के दराने व्याज मिळावे.
३) आयोगाच्या कृती मानकेनुसार नुकसान भरपाई मिळावी. अशी विनंती मंचास केली आहे.

## वितरण कंपनीची भूमिका

२) वि.प. तर्फे श्री संजय धर्मेश काळबांधे, उपकार्यकारी अभियंता उपाविभाग जत यांनी आपली बाजू मांडली वि. प.नी आपल्या लेखी उत्तरात ग्राहकाने योग्य ती कागदपत्रे उदा. (१) कोटेशनची रक्कम परत मिळणेचा विहीत नमुन्यातील अर्ज (२) मूळ पावती नसेल तर रु. १००/- मुद्राकित पेपरवर पावती हरवलेचे प्रतिज्ञापत्र (३) आगाऊ पोहोच पावती.हे सर्व सादर करावे असे पत्र दिनांक ०५.०४.२०१७ रोजी उपविभाग जत यांनी पत्र पाठविल्याचे म्हटले आहे.पत्र ८७२ दिनांक १७.०४.२०१७ पुन्हा पत्र पाठविले पण त्यांनी प्रतिसाद दिला नाही. दि. ३०.१२.२०१५ च्या पत्रामध्ये ग्राहकाने सत्यप्रत सादर करीत आहे असा उल्लेख केला आहे. तरी ग्राहकाने मूळ पावती आणि इतर सर्व कागदपत्रे सादर केलेस आम्ही ग्राहकास अनामत रक्कम परत करु असे म्हटले आहे. ग्राहकाने मूळ पावती सादर न केलेमुळे हा विलंब झाला आहे. तरी त्याची भरपाईची मागणी रद्द करावी असे म्हटले आहे.

३) ग्राहक प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे आणि संजय ध.काळबांधे यांनी मंचासमोर आपआपला युक्तीवाद केला सर्वकागदपत्रांचे वाचन करण्यात आले. पावती मिळत नसलेस नियमाप्रमाणे रु. १००/- च्या मुद्राकित पेपरवर प्रतिज्ञापत्र दिल्यास आम्ही त्वरीत प्रस्ताव पाठवून अनामत रक्कम परत करु असे वि.प.तर्फे सांगण्यात आले.

४) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदार यांची मागणी मंजूर करता येईल का?

उत्तर:- होय. अंशत:

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

५) सर्व कागदपत्रे व प्रत्यक्ष चर्चा यावरुन असे स्पष्ट होते की, ग्राहकाने मूळ पावती नियमाप्रमाणे हजर करणे आवश्यक होते. पण त्याने ती सादर केलेली नाही. तर सत्यप्रत सादर केलेचा उल्लेख आहे. त्यांच्या अर्जामध्ये तसे म्हटले आहे. सबब विलंब भरपाईच्या मागणीचा मुद्दा विचारात न घेता ग्राहकाचा मूळ अर्ज हा सन-२०१० चा आहे. त्यानंतर पुन्हा सन २०१५ मध्ये ग्राहकाने आपल्या मूळ अर्जाची प्रत महावितरणला त्यांच्या मागणीनुसार सादर केली तरी देखील ग्राहकाने कक्षाकडे दाद मागे पर्यन्त त्यांच्या अर्जावर महावितरणच्या संबंधीत अधिका-यानी लक्ष दिले नाही.ही बाब गंभीर आहे. सबब या ग्राहकाला योग्य माहिती न दिलेल्या कसूरदार यांच्याकडून रु. १,०००/- (एकहजार फक्त) वसूल करुन टोकन स्वरुपात ग्राहकास देण्यात यावे असे मंचास वाटते.

६) रु. १००/- चे प्रतिज्ञापत्रासह इतर सर्व कागदपत्रे विनाविलंब ग्राहकाकडून पूर्ण करुन घेऊन त्याने भरलेले अनामत रक्कम रु. ५,९७०/- (रु. पाच हजार नऊशे सत्तर फक्त) दिनांक १२.०७.२०१० ते परतावा मिळेपर्यन्त द.सा.द.शे बँकरेट व्याजासह रक्कम ग्राहकास दि. २२.१२.२०१७ पूर्वी परत करण्यात यावी .

## आदेश

१) तक्रारदार श्री विश्वास यल्लाप्पा कोळी, मु.पो. कासलिंगवाडी ता. जत. जि.सांगली यांची मागणी अशंत: मजूर करण्यात येत आहे.
२) दिनांक२२.१२.२०१७ पूर्वी तक्रारदार यांना व्याजासह अनामत रक्कम परत करण्यात यावी.
३) टोकन स्वरुपात तक्रारदार यांना रु. १,०००/- कसूरदाराकडून वसूल करुन देण्यात यावे.
४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

दिनांक ०१.०७.२०१७ पासून अध्यक्ष पद रिक्त आहे.

(श्री प्र. स. बुरांडे)
ग्राहक सदस्य

(प्र.वि. खपली) २७/९/२०१७
सदस्य सचिव